**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. २.**

**मी शपथेवर कथन करते की,**

**नाव –** द्रौपदा आप्पा चौगले.

**वय** - ८० वर्ष, **व्यवसाय** - घरकाम,

**राहणार.-** मेंढोली, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरतपास– श्रीमती. एस. ए. म्हामूलकर, सरकारी वकील.**

**१.** फिर्यादी व आरोपी क्र.१ माझी मुले असून आरोपी क्र.२ ही आरोपी क्र.१ ची पत्नी आहे. मी फिर्यादीच्या जुन्या घरात राहते. घटना दोन वर्षांपूर्वी सायंकाळी ०५.०० वाजता घडली होती. त्या दिवशी मोजणी आली होती. आरोपी क्र.१ त्यावेळी माझे परडे आहे असे म्हणत होता. त्यामुळे दशरथ तेथे गेला होता. त्यावेळी आरोपी क्र.१ ने लाकडी टोण्याने दशरथच्या पायावर, डाव्या हातावर आणि पाठीत मारहाण केली होती.

२. मी त्यांची भांडणे सोडवायला गेल्यावर आरोपी क्र.१ ने माझ्या उजव्या हातावर मारहाण केली होती. त्यांची भांडणे सोडवण्यास आलेल्या छायाला आरोपी क्र.१ ने मारले होते. त्यानंतर आम्ही सरकारी दवाखान्यात गेलो होतो. त्यांनी आम्हाला पोलिसांकडे जायला सांगितले होते. मला आरोपी क्र.१ ने मारहाण केलेला लाकडी टोणा दाखवल्यास ओळखता येऊ शकतो. आता मला तो टोणा दाखवला, तो तोच असून त्याला वस्तू क्र. अ देण्यात आलेला आहे. आज आरोपी न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – श्री. ए. जी. पाटील वकील.**

**३.** आरोपी क्र.१ त्याने विकत घेतलेल्या घरामध्ये राहतो. आरोपी क्र.१ ने त्याची पत्नी आरोपी क्र.२ च्या नावे घर विकत घेतले आहे. फिर्यादी दशरथ माझ्या पतीच्या घरामध्ये राहतो, ते माझ्या पतीचे वडिलार्जित घर आहे. मी फिर्यादी दशरथ सोबत राहते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे वागते. मला दशरथने आज काय सांगायचे याबाबत माहिती दिली आहे.

**४.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने फिर्यादीला टोण्याने मारल्याची कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांची भांडणे सोडवायला गेल्यावर आरोपी

क्र.१ ने मला टोण्याने हातावर मारल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असलेल्या घटनेच्या दिवशी मोजणीचे कोणतेही कर्मचारी आले नव्हते. फिर्यादी व आरोपी क्र.१ ची शेतीच्या वाटणीवरुन कायम भांडणे होतात. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझ्या पतीने करुन दिलेल्या वाटणीप्रमाणे वागत नाही.

**५.** मी सांगत असलेल्या घटनेच्या दिवशी फिर्यादी व त्याची पत्नी आरोपींच्या स्वयंपाक घरात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, तेथे आरोपी क्र.१ ला फिर्यादीने चुलीजवळच्या लाकडाने मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने छायाला तेथे ढकलून दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी तेथून मारहाण करुन पळून जाताना उंब–याला धडकून पडला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामध्ये त्याला जखमा होऊन रक्त आले होते.

**६.** मला प्रत्येक शेतक–याच्या घरात लाकूड, काठी व कोयता असल्याची माहिती आहे. मला दाखवलेल्या वस्तू क्र. अ प्रमाणे काठया शेतक–यांच्या घरात असतात. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझी काळजी घेत असल्यामुळे मी त्याला मदत करण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – ३०.०६.२०२५. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.